Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७७ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२९ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# वेळ आल्यावर सुनिल तटकरेच अजितदादांची साथ सर्वात आधी सोडतील-आमदार रोहीत पवार

**अलिबाग (वृत्तसंस्था)**–सुनील तटकरे आज जरी अजित पवार यांच्या सोबत असले, तरी जेव्हा भाजपमध्ये जायची वेळ येईल तेव्हा अजित पवारांची साथ सोडणारे पहिले नेते सुनील तटकरेच असतील अशी घणाघाती टिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहीत पवार यांनी केली. मुरूडमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. रोहित पवार यांचे मोठे शक्तिप्रदर्शन यावेळी पाहायला मिळाले. यावेळी शेकाप सरचिटणीस आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडीत पाटील, माजी आमदार अनिल तटकरे, आस्वाद पाटील, चित्रलेखा पाटील, प्रशांत नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळाव्याला संबोधीत करतांना आमदार रोहीत पवार यांनी सुनील तटकरे यांच्यावर सडकून टिका केली. '' राजकारणाच्या सुरूवातीला सुनील तटकरे आधी बॅरीस्टर अंतुले यांच्या सोबत होते. त्यांची साथ सोडली. शरद पवारांसोबत होते त्यांची साथ सोडली. शेकापच्या जयंत पाटील यांच्या सोबत होते. त्यांची साथ सोडली. त्यामुळे वेळ येईल तेव्हा अजित पवारांची साथ सोडणारे सुनील तटकरे हे पहिले व्यक्ती असतील'' असा हल्लाबोल रोहित पवार यांनी केला.तसेच दिल्लीची ताकद किती जरी मोठी असली तरी महाराष्ट्र दिल्ली पुढे झुकणार नाही असा विश्वास रोहित पवार यांनी



यावेळी व्यक्त केला. तसेच ''केंद्रात आणि राज्यात ज्यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादीचे सरकार होते. तेव्हा सुप्रिया सुळे खासदार होत्या, पण आपल्या मुलीला डावलून शरद पवार यांनी आपल्या पक्षातील नेत्यांना मंत्रीपदे दिली. काही लोकांना राज्यात तर काही लोकांना केंद्रात देखील मंत्रीपद दिले. आज हे नेते त्यांना सोडून गेलेत आणि आम्हाला पवार साहेबांनी काय दिले असा प्रश्न उपस्थित करत फिरत आहेत'', असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार गटावर निशाणा साधला आहे.याशिवाय ''आमच्याकडून सत्तेत गेले तेव्हा ९ खासदार आणि ९० आमदारकीची तिकीटांची स्वप्न पाहत होते. आज त्यांना चार जागांवर समाधान मानावे लागले आहे. येणारी निवडणूक ही महाराष्ट्राच्या अस्मितेची लढाई आहे. त्यामुळे भाजप पुरस्कृत उमेदवारांना लाखांच्या मताधिक्याने पाडा'' असे आवाहन त्यांनी यावेळी केले.तर शेकाप सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी सभेला संबोधीत करताना मोदी सरकारवर टीका केली. १९७७ साली इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लावून जी चूक केली होती. तीच चूक आज मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार करत आहे. लोकांच्या स्वातंत्र्यावर जेव्हा गदा येते तेव्हा लोक सत्ता उलथून लावतात. त्यामुळे आणीबाणीनंतर जी परिस्थिती काँग्रेसची झाली होती. तीच परिस्थिती भाजपची होणार, ईडीच मोदी सरकार बुडवेल'' असे ते म्हणाले.

# गोविंदाचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश ; मुंबई उत्तर-पश्चिममधून तिकीट मिळण्याची शक्यता

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेता गोविंदाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत गुरुवारी सायंकाळी प्रवेश केला. गोविंदा सायंकाळी ५ वाजता मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह मुंबईतील शिवसेना कार्यालयात पोहोचले. त्यानंतर थोड्याच वेळात त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. पक्ष प्रवेशानंतर गोविंदा म्हणाले की, मी २००४ ते २००९ या काळात राजकारणात होतो. १४ वर्षांनंतर मी पुन्हा राजकारणात आलो हा योगायोग आहे. माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो मी पूर्ण करेन, हे सांगायलाही ते विसरले नाहीत.पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अभिनेता गोविंदासोबतच दाखल झाले. शिंदे यांनी भगवा झेंडा हातात देत गोविंदाचे पक्षात स्वागत केले. या नंतर आता एकनाथ शिंदे हे गोविंदा यांना लोकसभा निवडणुकीत उमेदवारी जाहीर करतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, तशी कोणतीच घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली नाही. महायुती ४८ लोकसभा मतदार संघात निवडणूक लढत असून सर्व उमेदवारांची लवकरच घोषणा केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.महायुतीमध्ये भाजपने आपल्या २४ उमेदवारांची नावे जाहीर केलेली आहेत. तर अजित पवार यांनी देखील दोन उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या वतीने अद्याप एकही अधिकृत उमेदवार घोषित केलेला नाही. त्यामुळे या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गोविंदा यांना उमेदवारी जाहीर करण्याची शक्यता वर्तवली जात होती.शिवसेना मुंबईच्या उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघातून गोविंदाला तिकीट देऊ शकते. येथून उद्धव



गटाच्या शिवसेनेने अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी दिली आहे. गोविंदाने २७ मार्च रोजी माजी आमदार कृष्णा हेगडे यांच्यासोबत भेट घेतली होती. तेव्हापासून ते निवडणूक लढवणार असल्याची अटकळ बांधली जात होती.गोविंदा लोकसभा निवडणूक लढवण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी २००४ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर उत्तर मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यांनी भाजपच्या राम नाईक यांचा ४८,२७१ मतांनी पराभव केला. गोविंदा २००४ ते २००९ पर्यंत खासदार होते.विकासाच्या मुद्यावर प्रभावित होऊन गोविंदा यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. जेव्हा आपले सरकार आले, तेव्हा सर्व सण उत्सव सुरू झाले. तो पर्यंत आधीच्या सरकारने सर्व बंद केले असल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. मुंबईकरांना अपेक्षीत असलेला विकास सध्या सुरू असल्याचा दावा देखील एकनाथ शिंदे यांनी केला आहे. गोविंदा यांनी पक्षात येताना कोणतीच अपेक्षा आपल्याकडे व्यक्त केली नसल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीसाठी गोविंदा यांनी कोणतीही अट घातलेली नसल्याचेही शिंदे यांनी सांगितले. गोविंदा हे चित्रपटसुष्टी आणि सरकारमधील दुवा म्हणून काम करतील, अशी अपेक्षाही शिंदे यांनी व्यक्त केली.गोविंदा यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. एवढ्या तेजीने विकासाची कामे सुरू असल्याचेही या वेळी गोविंदा यांनी सांगितले. माझ्या आई-वडीलांचे आणि बाळासाहेब ठाकरे यांचे चांगले संबंध होते. आता इतक्या वर्षानंतर शिवसेनेशी जोडल्या गेल्याचा मला आनंद असल्याचेही गोविंदा यांनी म्हटले आहे. मुंबईतील चित्रपट सुष्टीसाठी आपल्याला काम करण्याची इच्छा असल्याचेही ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाचेही गोविंदा यांनी कौतूक केले.संजय निरुपम यांनी खिचडी चोराचा प्रचार करणार नसल्याचे सांगितले आहे. मात्र, मला याची माहिती माध्यमांतूनच मिळाली आहे. ते जे बोलले ते खरे देखील आहे. एखाद्या खिचडी चोराचा प्रचार करायला कोणाला आवडेल? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ज्यांनी डेड बॉडी बॅगमध्ये पैसे खाल्ले त्यांच्या बाबत संजय निरुपम यांनी घेतलेली भूमिका योग्य असल्याचे शिंदे म्हणाले.

# संजय राऊतांनी पाठीत खंजीर खुपसला-प्रकाश आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–संजय राऊत यांनी आमच्या पाठीत खंजीर खुपसला. आम्हाला आघाडीच्या भ्रमात ठेवून लोकसभा निवडणुकीत जागा पाडण्याचे कारस्थान रचले, असा गंभीर आरोप गुरुवारी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

शरद पवार यांच्या सिल्वर ओक निवासस्थानावर झालेल्या बैठकीत तुम्ही काय भूमिका घेतली होती, तुम्ही आमच्या विरोधात अकोल्यातून उमेदवार उभा करण्याचा मनोदय व्यक्त केला होता की नाही, असा सवालही प्रकाश आंबेडकर यांनी एक ट्विट करून केलाय. संजय राऊत यांनी संविधान रक्षणाची जबाबदारी प्रकाश आंबेडकर यांची असल्याचे सकाळी म्हटले होते. त्यालाच आंबेडकरांनी चोख प्रत्युत्तर दिलेय.महाविकास आघाडीतील जागावाटपावरून सध्या मोठा संघर्ष निर्माण झाला आहे. त्यातच प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत आपला संताप व्यक्त केला आहे. संजय राऊत किती खोटं बोलणार? तुमची आणि माझी मते सारखीच असतील तर तुम्ही आम्हाला बैठकीला का बोलावत नाही? फोर सीझन्स हॉटेलमध्ये ६ मार्चला झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला का बोलावले नाही? वंचितला आमंत्रण न देता आजही



बैठक का घेत आहात?'', असे अनेक सवाल आंबेडकर यांनी उपेक्षित केले आहेत.''सहयोगी असून तुम्ही पाठीवर वार केलेत! सिल्व्हर ओक्स इथल्या मीटिंगमध्ये तुमचे वागणं कसे होते हे आम्हाला माहीत आहे. अकोल्यात आमच्या विरोधात उमेदवार उभा करण्याचा मुद्दा सुद्धा तुम्ही उपस्थित केला हे खरे नाही का? तुम्ही कोणत्या प्रकारचे नाते निर्माण करत आहात? एकीकडे तुम्ही आघाडीचा आभास दाखवत आहात तर दुसरीकडे आम्हाला पाडण्याचे कारस्थान करत आहात. हे तुमचे विचार आहेत?, असे म्हणत आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

## महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित

# भाजप २७,शिवसेना १४ आणि राष्ट्रवादी ५ जागांवर लढवू शकते निवडणूक

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रातील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीमध्ये लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील लोकसभेच्या ४८ जागांपैकी भाजप २७, शिवसेना १४ आणि राष्ट्रवादी ५ जागांवर निवडणूक लढवणार आहे. त्याची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी राज्यातील लोकसभेच्या ४८ जागांपैकी भाजप ३० ते ३२ जागांवर, शिवसेना १० ते १२ जागांवर आणि राष्ट्रवादी ६ ते ८ जागांवर उमेदवार उभे करू शकते, अशी अटकळ होती. ६ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हे एकमत झाले.त्याचवेळी महाविकास आघाडीने तिन्ही पक्षांची (काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) ५ वाजता बैठक



बोलावली असून, यात जागावाटप निश्चित करण्यात येईल. कालच शिवसेनेच्या उद्धव गटाने १७ उमेदवार जाहीर केले होते. त्यापैकी ३ जागांवर काँग्रेसचे दावेदार तिकीटाच्या प्रतीक्षेत होते. या घोषणेने शरद पवार संतापले आहेत.

# महाविकास आघाडीत मिठाचा खडा:काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले ठाकरे गटावर नाराज

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेनेच्या ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या १७ उमेदवारांच्या नावांची घोषणा केल्यानंतर विरोधकांच्या महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला आहे. ठाकरे गटाने सांगलीच्या जागेवर परस्पर उमेदवार घोषित केल्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाराज झालेत. यामुळे ते महाविकास आघाडीच्या आज होणाऱ्या बैठकीला गैरहजर राहणार आहेत. यामुळे मविआतील धुसफूस वाढण्याची चिन्हे आहेत. उद्धव ठाकरे गटाने सांगली लोकसभा मतदार संघात कुस्तीपटू चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या उमेदवारीवर काँग्रेसने हरकत घेतली आहे. ठाकरे गटाने जागावाटपाची चर्चा सुरू असताना परस्पर सांगलीचा उमेदवार घोषित केल्याचा आरोप काँग्रेस नेत्यांनी केला आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, संजय निरुपम यांनी या प्रकरणी ठाकरे गटाच्या निर्णयावर आक्षेप घेतला होता. तसेच त्यांना



या निर्णयावर फेरविचार करण्याचीही विनंती केली होती. एवढेच नाही तर काँग्रेस नेते विश्वजित कदम यांनी या प्रकरणी थेट काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेऊन आपल्या भावना कळवल्या होत्या.सूत्रांच्या माहितीनुसार, महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या चर्चेत सांगली व भिवंडी या २ जागा काँग्रेसला देण्यावर जवळपास मतैक्य झाले होते. पण त्यानंतरही उद्धव ठाकरे यांनी सांगलीची जागा परस्पर चंद्रहार पाटील यांना देऊन टाकली. त्यांच्या या कृतीमुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले प्रचंड नाराज झालेत. या नाराजीपोटी ते महाविकास आघाडीच्या आगामी बैठकीला गैरहजर राहणार असल्याचाही दावा केला जात आहे. खरेच असे झाले तर ठाकरे गटाच्या एका निर्णयामुळे विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीत फूट पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

# भाजप सुडाचं राजकारण करतंय-सुप्रिया सुळे

**पुणे (वृत्तसंस्था)**–देशभरामध्ये छत्रपतींच्या गादीचा मान राखला जातो. उदयनराजे जेव्हा आमच्यासोबत होते, तेव्हा त्यांचा मानसन्मान राखला जायचा, कोणत्याही बैठकीला उदयनराजे उपस्थित राहिले असता, त्यांची बसण्याची व्यवस्था ही शरद पवारांच्या शेजारी केली जायची. मुलाप्रमाणे उदयनराजेंना शरद पवारांनी जीव लावला. तेवढेच प्रेम आणि जिव्हाळा उदयनराजेंनीदेखील लावला. मात्र, भाजपकडून या गादीचा अपमान करण्याचा प्रयत्न केला जात असून, उदयनराजे यांना उमेदवारी जाहीर न होणे ही बाब वेदनादायी आहे, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. दरम्यान, भाजपला शरद पवार यांना संपवायचं आहे. भाजप सुडाचं राजकारण करत आहे, असा आरोपही त्यांनी केला.सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी खडकवासला मतदारसंघाचा दौरा केला. यावेळी त्यांनी मतदारसंघातील विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. या दरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.महाविकास आघाडीमध्ये कोल्हापूर आणि सांगलीच्या जागांवरून वाद सुरू



आहे. त्यामुळे आघाडीत बिघाडी झाले असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे, यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, देशभरामध्ये पाचशेहून अधिक लोकसभेच्या जागा आहेत. त्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये जागा लढवण्यासाठी महाविकास आघाडी एकत्रित येत असेल, तर काही जागांवरती वाद होणे स्वाभाविक आहे. मात्र, महाविकास आघाडीमध्ये लोकशाही असून, सामंजस्याने याच्यावरती तोडगा काढण्यात येईल. तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसकडून ज्या पद्धतीने उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचेदेखील उमेदवार प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे लवकरच जाहीर करतील, असे त्या म्हणाल्या.बारामतीमध्ये मी तिकिट मागितलं आहे. मी निवडणूक लढणार आहे. मग मी दुसऱ्यांच्या घरामध्ये कशाला डोकावू? अजितदादा माझ्यासाठी प्रचार करत होता, तेव्हा मी माझ्या मोठ्या भावाला इतके कष्ट दिले नाहीत, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी टोला लगावला.बारामती मतदारसंघातील दादांच्या गाठीभेटीविषयी सुळे म्हणाल्या, देशात लोकशाही आहे, त्यामुळे कोणी कोणाच्या भेटीगाठी घ्यायच्या याचे स्वातंत्र्य असून, प्रत्येकाचा वेगळा पॅटर्न असतो. त्यानुसार दादा भेटीगाठी घेत आहेत. मात्र, मला आनंद एकाच गोष्टीचा आहे की, दादा जेव्हा माझ्यासाठी प्रचार करत होते, तेव्हा मी माझ्या मोठ्या भावाला एवढे कष्ट दिले नाहीत, याचे मला समाधान आहे, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांना टोला लगावला.


# ८४० कोटींच्या घोटाळा प्रकरणात प्रफुल्ल पटेलांना अखेर दिलासा

**मुंबई**–राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधात सुरू असलेल्या कथित घोटाळा प्रकरणाचा तपास सीबीआयने आता बंद केल्याची माहिती समोर येत आहे. प्रफुल्ल पटेल यांच्यावर यूपीए सरकारमध्ये नागरी विमान वाहतूक मंत्री असताना एअर इंडियासाठी विमान खरेदी व्यवहारात अनियमितता असल्याचा आरोप करण्यात आला होता.आरोपांनुसार प्रफुल्ल पटेल यांच्यावर सरकारचे ८४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. प्रफुल्ल पटेल यांच्याशी संबंधित प्रकरण हे सीबीआयकडे प्रलंबित होते. मागील सात ते आठ वर्षांपासून सीबीआयकडून याबाबत तपास केला जात होता. मात्र, आता सीबीआयने क्लोजर रिपार्ट दिल्याने पटेल यांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, विरोधकांनी यावर टीका केली असून भाजपसोबत हातमिळवणी केली की अनेकांची मागची चौकशी बंद होते, असे म्हटले आहे.प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधात कोणताही पुरावा सापडला नसल्याचे सीबीआयने क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे. २०१७ मध्ये पटेलांवर सीबीआयने गुन्हा दाखल केला होता. मंत्रिपदावर असताना प्रफुल्ल पटेल यांनी भ्रष्टाचार करून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा हा कथित आरोप होता. तेव्हापासून सीबीआयची चौकशी आणि याप्रकरणी तपास सुरू होता.

# हे देवा,यांना क्षमा कर! कारण...

**ज्या दिवशी प्रभू येशू ख्रिस्तांना वधस्तंभावर लटकवण्यात आले तो दिवस शुक्रवारचा होता. त्यामुळे येशू ख्रिस्तांच्या स्मरणार्थ हा दिवस गुड फ्रायडे म्हणून पाळतात. ख्रिश्चन धर्माचे अनुयायी हा दिवस शोक दिवस म्हणूनही पाळतात. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या या संकलित लेखातून वाचा ज्ञानवर्धक माहिती... संपादक.**

जगभर साजरा होणारा सण- शुभ शुक्रवार! प्रामुख्याने जे लोक हा सण साजरा करतात, त्यांच्या प्रेषिताला खरेतर आज क्रुसावर चढविले होते. एवढेच काय ज्या रोमन शिपायांनी त्याला क्रुसावर चढविले होते, त्यांच्यापैकी एकाने स्वत: त्याच्या छातीत भाला भोसकून तो नक्की मृत झाला आहे ना, याची खात्रीही केली होती- (पवित्र बायबल: संत योहान- अध्याय: १९ : वचन २४). तरी या दिवसाला जगभरात ख्रिस्ती बांधव शुभ शुक्रवार- गुड फ्रायडे म्हणतात! का बरे?.... कारण हा दिवस इतिहासातील येशू ख्रिस्ताच्या जीवनातील सत्यकथेच्या परमोच्च बिंदूकडे घेऊन जातो. या दिवशी येशू ख्रिस्तापूर्वी होऊन गेलेल्या अनेक संदेष्ट्यांनी वर्तवलेली येशूविषयीची सर्वात महत्त्वाची भविष्यणी पूर्ण झाली होती. कोणतीही चूक, कोणतेही पाप न केलेल्या परमेश्वराच्या पुत्राला माणसांनी सुळावर चढविले. मग हा शुक्रवार शुभ कसा? त्याचे उत्तर बायबलच्या नव करारातील चार शुभवर्तमानात आहे. येशूंच १२ शिष्यांपैकी फक्त संत मार्क, संत लुक आणि संत योहान यांनी येशूंच्या मृत्यूनंतर व पुनरुत्थानानंतर अनेक वर्षांनी त्यांचे चरित्र लिहून ठेवले आहे. त्यानुसार मृत्यूच्या तिसऱ्या दिवशी जेव्हा त्यांचे शिष्य त्यांच्या मृतदेहाला सुगंधी मसाले लावण्यासाठी त्यांच्या कबरीजवळ गेले, तेव्हा त्यांना तेथे केवळ त्यांची त्यागाची वस्त्रे आढळली. तेव्हा उभ्या असलेल्या एका दिव्य आकृती- देवदूताने त्यांना विचारले, तुम्ही येशूला शोधीत आहात का? तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यात का करता? तो तुमच्या आधीच गालील गावामध्ये त्याने मृत्यूपूर्वी सांगितल्यानुसार गेलेला आहे. (पवित्र बायबल: संत लुक- २४ वा अध्याय: वचन ५ व ६) येशूने मृत्यूला शांतपणे सामोरे जाऊन, मृत्यूवर विजय मिळवून ते पुनरुत्थानित झाले. म्हणून शुक्रवारच्या या दिवसाला शुभ शुक्रवार म्हटले जाते. अनेकांचा येशूच्या या पुनरुत्थावर विश्वास बसत नाही. परंतु येशू ख्रिस्ताने पुनरुत्थानानंतर त्यांच्या १२ शिष्यांसह सुमारे ५०० पेक्षा अधिक लोकांना दर्शन दिले. हिंदू धर्माचे महान प्रसारक योगी परमहंस योगानंद यांनीही या गोष्टीची साक्ष दिली आहे. त्यांच्या ऑटोबायोग्राफी ऑफ अ योगी या पुस्तकाला डॉ.डब्लू.वा.इव्हेन्स वेन्टस् यांची प्रस्तावना आहे. स्वामींनी या ग्रंथाच मराठी आवृत्तीतील प्रश्न क्र.६७८ व ६७९ या पृष्ठावर स्वत:ला झालेल्या प्रभू येशूंच दर्शनाचा वृत्तांत दिला आहे. येशू ख्रिस्तांच्या १२ शिष्यांपैकी एक असलेला संत थॉमस याने येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाविषयी संशय घेतल्याचा उल्लेख बायबलमध्ये आढळतो. पुनरुत्थानानंतर प्रभू येशू त्यांच्या शिष्यांना भेटले, त्यावेळी त्या खोलीत थॉमस नव्हता, तर इतर शिष्यांनी त्याला प्रभू येशूंच्या दर्शनाचे वृत्त सांगितले. तेव्हा तो म्हणाला, मी त्यांना प्रत्यक्ष पाहिले, तरच मी त्यांच्या जिवंत होण्यावर विश्वास ठेवीन. त्यानंतर एकदा थॉमससह सर्व शिष्य एका खोलीत प्रार्थना करीत होते व ती खोली आतून बंद होती. त्यावेळी प्रभू येशू तेथे अचानक प्रकटले. त्यांच्या भोवतीचा प्रकाश व त्यांचे तेज पाहून शिष्य घाबरले. प्रभू त्यांना म्हणाले, तुम्हास शांती असो प्रभू येशू ख्रिस्ताने संत थॉमस या शिष्यला जवळ बोलावले आणि आपल्या छातीमध्ये ज्याठिकाणी रोमन शिपायाने भाला भोसकला होता, तेथे त्याचे बोट लावले व विचारले, आतातरी विश्वास ठेवतोस का? त्यावर सद्गदीत होऊन थॉमस म्हणाला, माझा प्रभू, माझा देव. माणसाच्या संशयी प्रवृत्तीला ओळखून येशूने थॉमस या आपल्या शिष्यला म्हटले, आता तू पाहिले म्हणून विश्वास ठेवला आहेस. परंतु जे न पाहता विश्वास ठेवतात ते धन्य!



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**



प्रभू येशूंचे मृतामधून पुन्हा उठणे व अनेकांना दर्शन देणे, हे त्यांचे देवत्व व अमरत्व सिद्ध करते. पण त्याही पलीकडे हे सत्य हा शुक्रवार स्पष्ट करतो. ते म्हणजे सत्याचा असत्यावरील विजय, प्रेमाचा द्वेषावरील विजय. कारण क्रुसखांबावर आपल्या अंतिम घटिका मोजत असताना या दिव्य महात्म्याने हे देवा, यांना क्षमा कर! कारण ते काय करतात त्यांना कळत नाही (पवित्र बायबल: संत लुक- अध्याय २३: वचन ३४) असे म्हटले होते. आज सुसंस्कृत जगाला दहशतवादाच्या माध्यमातून वेठीस धरले जात आहे, अशावेळी आपल्या मारेकर्यांनाच क्षमा करावी, म्हणून परमेश्वराकडे याचना करणारे प्रभू येशू केवळ आकाशापर्यंतच उंच होत नाही, तर स्वर्गापर्यंत उंच होत आहेत. प्रभू येशूने त्याचे संपूर्ण जीवन मानवाला जीवनाचे खरे ध्येय समजावून सांगण्यात घालविले. ज्या इस्त्राईलात जेरुसलेम येथे येशूंचा जन्म झाला तेथील धर्मग्रंथात न्याय आणि शिक्षेबद्दल असे सांगितले होते की, कुणी कोणाचा डोळा फोडला तर त्याचा डोळा फोडण्यात यावा. कुणी कोणाचा हात तोडला असेल तर त्याचा हात तोडण्यात यावा. परंतु येशू ख्रिस्ताने मात्र आपल्या अनुयायास सांगितले, दुष्टाला अडवू नका, जो तुमच्या उजव्या गालावर मारतो, त्याच्यापुढे दुसरा गाल करा. जो तुमची बंडी हिसकावून घेऊ पाहतो, त्याला तुझा अंगरखाही दे, याप्रमाणे येशू ख्रिस्ताला सूडचक्रातून मानवजातीची सुटका करायची आहे. कारण रागाने राग आणि द्वेषाने द्वेष वाढतो हाच इतिहास आहे. येशूने म्हटले, तुम्ही शत्रूवर प्रेम करा, शेजार्यावर प्रीती करा! हा जगावेगळा सल्ला कुणालाही पाळायला कठीणच आहे, परंतु प्रभूने यामागे दिव्य तर्कसंगती सांगितली आहे. तो म्हणतो, जे तुम्हाला उसने देतात, त्यांना तुम्ही परत मिळेल या भावनेने उसने दिले, तर त्यात काय मोठेपणा? पापी लोक हे पापी लोकांना उसने देतात, तुम्ही पाप पुण्याचा विचार न करता सर्वांवर सारखे प्रेम करणार्या परमेश्वराचे पुत्र आहात ना? मग त्याच्यासारखे व्हा. तो म्हणजे परमेश्वर चांगले व वाईट अशा दोन्ही लोकांच्या शेतावर पाऊस पाडतो व त्यांना विपुल सुख देऊ इच्छितो. जे तुमचा द्वेष करतात त्यांच्यावर प्रेम केले तरच ते दिव्य प्रेम, नाही तर आपल्यावर प्रेम करणार्यांवर प्रेम करणे हा तर व्यवहार झाला. आज संपूर्ण जगामध्ये दु:खी लोकांचे अश्रू पुसणार्या, आजार्यांची सेवा करणार्या, मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्यांना, युद्धातील जखमींना, भूकेल्यांना अन्न देणार्या, गरिबांची सेवा करणार्या असंख्य संस्था, व्यक्ती जे अफाट प्रयत्न करीत आहेत, त्यामागे उभे आहे त्या दिव्य येशू ख्रिस्ताने संपूर्ण मानवजातीच्या उद्धारासाठी केलेले क्रुसावरचे समर्पण. त्या महान, करुणामयी, प्रेममयी देवपुत्रास शतश: नमन! !! गुड फ्रायडेच्या सर्व ईश्वरप्रेमींना हार्दिक प्रेमळ शुभेच्छा !!

# दलबदल करणाऱ्या उमेदवारांचा करेक्ट कार्यक्रम करण्याची हिच वेळ

सध्याच्या परिस्थितीत जवळपास सर्वच पक्षांची उमेदवारी जाहीर झालेली आहे.या उमेदवारीमध्ये काही उमेदवार पक्षांशी निष्ठा ठेवणारे तर काही उमेदवार आयात केलेले किंवा सत्तेच्या लालसेने किंवा ईडीच्या कारवाईच्या भितीने आयाराम -गयाराम असे अनेक उमेदवार सर्वच पक्षांमध्ये आपल्याला रिंगणात उतरल्याचे दिसतात.अशां उमेदवारांना पक्षांशी निष्ठा नाही ते उमेदवार देशांच्या जनतेचे कसे काय भले करणार याचाही विचार देशातील मतदारांनी करायला हवा. आयाराम-गयाराम हे सत्ता लोभी असल्याने स्वतःच्या स्वार्थापोटी संपूर्ण नितिमत्तेवर पाणी फेरून सत्तेसाठी कोणत्याही पक्षांसमोर लोटांगण घालतांना दिसतात.सध्या लोकसभेच्या निवडणुकांसाठी राज्यातच नाही तर देशात अनेक पक्षातील राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे दलबदल झाले आहेत.परंतु यासाठी ठोस कायदा नाही किंवा शिक्षाही नाही मनात येईल तेव्हा सत्तेसाठी पक्ष बदलविने हा राजकीय पुढाऱ्यांचा गोरखधंदा बनल्याचे दिसून येते. कारण काही कायदे राजकीय पुढारी आपल्या हिताचे बनवित असतात.ही लोकशाहीच्या दृष्टीने शोकांतिकाच म्हणावी लागेल.यामुळे सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधीवरून व राजकीय पुढाऱ्यांवरून हळूहळू विश्वास उडत असल्याचे दिसून येते.पक्ष बदलल्यानंतर त्याला सहा वर्षांसाठी पक्षातुन काढले जाते मग दुसरा पक्ष त्याला का घेतो? दुसऱ्या पक्षासाठी त्याची वर्तणूक कशी काय चांगली असेल?ही राजकीय पुढाऱ्यांची मनमानी नाही का? त्यामुळे पक्ष बदलल्या नंतर कोणत्याही पक्षाने त्या राजकीय पुढाऱ्यांना आपल्या पक्षात आश्रय द्यायला नको,जर दिला तर कोणतेही राजकीय पद किंवा लोकप्रतिनिधीत्व पद यापासून कोसो दूर ठेवायला हवे.परंतु पक्ष सोडलेल्या राजकीय पुढाऱ्यांना हे सर्वच संपत्तीच्या बळावर ताबडतोब मिळते त्यामुळे असे वाटते की यांच्यासाठी काहीही कायदे कानुन किंवा नियमावली नसल्याचे दिसून येते.राज्यात किंवा देशात पक्ष बदलण्या मागचा मुख्य उद्देश म्हणजे त्यांच्या जवळ असलेली करोडो रुपयांची वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल संपत्ती असने ती वाचवण्यासाठी कोणत्याही सत्ताधारी पक्षात प्रवेश करणे किंवा केलेले घोटाळे बंद करण्यासाठी किंवा वाममार्गाने कमविलेल्या संपत्तीवर ईडी किंवा इतर कारवाई होवू नये या उद्देशाने राज्यात राजकीय पुढारी यापक्षातुन त्यापक्षात उंदरा सारख्या उड्या मारतांना दिसतात.तरीही स्वतःला आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी- जनप्रतिनिधी) समजतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.राज्यात किंवा देशात गेल्या काही वर्षांत असा एकही राजकीय पुढारी दिसला नाही की त्याने जनहितासाठी किंवा लोककल्याणासाठी पक्ष सोडला असावा.राजकीय पुढारी या पक्षातुन त्या पक्षात जातात तेव्हा त्यांना नीतिमत्ता,पक्षांचे नियम, पक्षासाठी घेतलेली शपथ, एकनिष्ठता, समाजाबद्दलची जागृकता,पक्षाबद्दल स्वाभिमान पक्षाची नियमावली,पक्षाने आपल्याला दिलेले वैभव हे संपूर्ण एका क्षणात विसरतात. अशांना धडा शिकविण्याची हिच खरी वेळ आहे.स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणारा पक्ष किंवा राजकीय वर्तुळात विरोधी पक्षावर ताशेरे ओढणारे राजकीय पुढारी अचानक सर्वच गोष्टी विसरतात हे कसे काय? कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) किंवा राजकीय पुढारी असो तो जेव्हा पक्ष बदलतो तेव्हा त्याला काहीच कसे काय वाटत नाही?ज्या पक्षाचे अनेक वर्षे प्रतिनिधीत्व राजकीय पुढारी करतो तेव्हा तो विरोधकांवर तुटुन पडतो.अशा वेळेस लोकांना खरे वाटते व तो राजकीय पुढारी लोकांची मने जिंकतो.परंतु हाच राजकीय पुढारी ज्यांच्या विरोधात बोलतो त्यांच्याच पक्षात प्रवेश करतो तेव्हा याला काय म्हणावे? यावरून स्पष्ट होते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वार्थासाठीच राजकारण करीत असल्याचे दिसून येते ही बाब मतदारांनी लक्षात ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी जेव्हा पक्ष बदलवितात तेव्हा सर्वसामान्यांच्या जिव्हारी लागते व मन दु:खावते.कारण राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे किंवा आमदार -खासदार यांनी सत्तेसाठी पक्ष बदलविने म्हणजे ज्या ताटात खाल्ले त्याच ताटाला छिद्र पाडने होय. महाराष्ट्रातील राजकारण पहाता राजकीय पुढाऱ्यांना असे वाटते की फक्त आपणच खूप हुशार आहोत व बाकी सर्व लोक अणपड-गवार आहेत असे वाटते.कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे जनुकाय राजकीय भुकंप आला की काय असे वाटते.राजकीय उलथापालथमध्ये राज्याचा करोडो रुपयांचा चुराडा झाला.याचा सरळ परिणाम गरीब, सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना भोगावा लागतो आहे. करोडोचा भ्रष्टाचार राजकीय पुढारी करतील आणि त्याचे प्रायचित्य गरीब,सर्वसामान्यांनी व शेतकऱ्यांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा?कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय दृष्ट्या सर्वसामान्यांची किंमत झीरोबजेटमध्ये असल्याचे दिसून येते. यामुळे राजकीय पुढारी तुपाशी आणि सर्वसामान्य जनता उपाशी असल्याचे दिसून येते. राजकीय पुढारी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात व सत्तेसाठी हपहपल्यासारखे करतात व एकमेकांवर कुत्र्या-मांजरासारखे तुटुन पडतात. यात सर्वसामान्यांचा किंवा मतदारांचा तिळमात्र विचार केला जात नाही हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांत राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थापोटी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.कारण आमदारांना-खासदार यांना (लोकप्रतिनिधींना) जनता पाच वर्षांसाठी निवडून यासाठी देते की राज्याचा आणि देशाचा कारभार सुरळीत चालावा व विकास झपाट्याने व्हावा.परंतु राजकीय पुढारी राज्याचा किंवा सर्वसामान्यांचा विकास करण्यापेक्षा स्वतःच्या विकासावर जास्त भर देतांना दिसतात मग तो कोणत्याही पक्षाचा पुढारी असो.याचे जीवंत उदाहरण सर्वांसमोर आहे. राजकीय पुढारी निवडुण आल्यानंतर मतदारांना विसरतात हे जनतेला चांगलेच लक्षात आले. गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रात राजकीय पुढाऱ्यांनी जनुकाय तमाशा मांडला की काय असे चित्र सर्वांनीच पहाले.यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी जनतेच्या भावनांशी वाईट खेळ खेळतांना दिसतात.सत्ताधारी पक्षाने भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या पक्षातील राजकीय पुढाऱ्यांना सत्ताधारी पक्ष आपल्या सोबत घेतो हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.मग काय भ्रष्टाचारी राजकीय पुढारी जर सत्ते सोबत गेले म्हणजे शुद्ध होतात काय? असाही प्रश्न उपस्थित होतो.अशाप्रकारे असे अनेक प्रश्न उद्भवतात.यामुळे राजकीय दृष्ट्या राज्याची परिस्थितीत दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसते. याकरीता कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढारी आमदार-खारदार (लोकप्रतिनिधी) यांच्यावर लगाम कसने अत्यंत गरजेचे आहे.कारण राज्याच्या घडामोडी या लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.राजकीय पुढारी आपल्या स्वार्थापोटी पक्षांतर करतात व सत्तेत सहभागी होतात.याचा मनस्ताप लोकांमध्ये दिसून येतो.याकरीता पक्षांतर बंदी कायद्यात मोठ्या प्रमाणात सुधारणेची गरज आहे.कारण कोणताही पक्ष असो त्याला पक्षाबद्दल निष्ठा व आपुलकी असायलाच हवी.परंतु सध्याच्या परिस्थितीत सर्वच राजकीय पुढारी निष्ठा,पक्षाचे आचारविचार हे सर्व बाजुला सारुन सत्तेकडे धावतांना दिसतात.यामुळे कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवरने अत्यंत गरजेचे आहे. सध्या राज्यातील राजकीय घडामोडीमुळे सर्वसामान्यांनमध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.जोपर्यंत राजकीय पुढाऱ्यांवर पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा होत नाही तोपर्यंत असाच राजकीय लपंडाव सुरू राहील.त्यामुळे राजकीय पुढारी खुर्चीसाठी सर्वसामान्यांचा बळी घ्यायला सुध्दा मागेपुढे पाहत नाहीत हे त्यांच्या पक्ष बदलण्याच्या प्रक्रियेत वरून स्पष्ट दिसून येते.परंतु मतदार बंधु-भगिनी दलबदल करणाऱ्या सर्वच उमेदवारांना त्यांची योग्य जागा दाखविण्याची हिच खरी संधी आहे.राज्यातील किंवा देशातील कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवार असो त्याने जर दलबदल केले असेल तर मतदारांनी कोणालाही मतदान करावे.परंतु दलबदल वाल्या कोणत्याही उमेदवाराला अजीबात मतदान करु नये.कारण सत्तेसाठी तो पक्षाचा होवू शकत नाही तर आपला किंवा आमजनतेचा काय होईल याचाही मतदारांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

# निर्भय व हिंसामुक्त निवडणूकीसाठी योगदान देण्याची संधी-निवडणूक निरीक्षक अनिमेष कुमार पराशर

## निवडणूक निरीक्षकांकडून यंत्रणेचा आढावा; नवयुवकांचा मतदान प्रक्रीयेत सहभाग वाढवा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीसाठी पहिल्या टप्प्यातील निवडक जिल्ह्यात गडचिरोली जिल्ह्याचा समावेष असून या मतदार संघावर संपूर्ण देशाचे लक्ष केंद्रीत झाले आहे. आपले कार्य दाखविण्याची हीच संधी असून येथील निवडणूक निर्भय, हिंसामुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी पूर्ण योगदान देण्याचे आवाहन निवडणूक निरीक्षक अनिमेष कुमार पराशर यांनी केले. निवडणूक निरीक्षक अनिमेष पराशर, निवडणूक खर्च निरिक्षक एस. वेणु गोपाल व कायदा व सुव्यवस्था निरीक्षक राजपाल सिंग यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात निवडणूक यंत्रणेचा आढावा घेतला. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी संजय दैने, सहायक निवडणूक अधिकारी राहुल मीना (गडचिरोली), मानसी (देसाईगंज) आदित्य जीवने (अहेरी), किशोर घाडगे (चिमूर) संदीप भस्के (ब्रह्मपुरी) डॉ. रवींद्र होळी (आमगाव), अतिरिक्त जिल्हाधिकारी विजय भाकरे, निवासी उपजिल्हाधिकारी



सुनिल सुर्यवंशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी विवेक घोडके, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड (देवरी), विवेक साळुंखे (कुरखेडा), सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार आदी यावेळी उपस्थित होते.निवडणूक निरीक्षक श्री पराशर पुढे म्हणाले की ७५ टक्केपेक्षा जास्त मतदान होण्यासाठी निवडणूक यंत्रणेने घरोघरी प्रत्यक्ष मतदारांशी संपर्क करून त्यांना मतदानासाठी आवाहन करावे. विशेषत: नवयुवकांचा मतदान प्रक्रीयेत सहभाग वाढेल यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले.लांब चालत जाव्या लागणाऱ्या मतदान केंद्रावर सुदृढ व निरोगी मतदान अधिकारी नियुक्त करावे, सर्व मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्या, मतदान यंत्रांची हाताळणी करतांना त्याबाबत राजकीय प्रतिनिधींना अवगत करावे, मतदान व मतमोजणी प्रक्रीया तत्परतेने व्हावी यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण द्यावे आदी सूचना त्यांनी केल्या.जिल्ह्यात मतदान केंद्र किती आहेत, त्यातील किती संवेदनशील आहेत, मतदारांची संख्या, सर्व्हीस व्होटर, निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचारी, ८५ वर्षावरील तसेच दिव्यांग मतदार यांना टपाली मतपत्रीकेची सुविधा, मतदान यंत्रांची रसमिसळ प्रक्रिया, उपलब्ध मनुष्यबळ, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, सुरक्षा यंत्रणा याबाबत निवडणूक निरीक्षकांनी माहिती जाणून घेत केलेल्या कार्यवाहीचा यंत्रणेकडून आढावा घेतला.जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने यांनी सादरीकरणाद्वारे निवडणूकीशी संबंधीत माहिती दिली तर जिल्हा पोलिस अधिक्षक निलोत्पल यांनी सुरक्षाविषयक उपाययोजनांची माहिती दिली.बैठकीला सर्व निवडणूक नोडल अधिकारी उपस्थित होते.

# निवडणुकीच्या कळा अन् पाणीटंचाईच्या झळा!

**परभणी | प्रतिनिधी**

अद्याप मार्च महिनाही संपलेला नाही. मराठवाड्यातील मान्सूनच्या पावसाचा मागच्या काही वर्षांचा पॅटर्न पाहिला तर किमान जून महिन्याच्या अखेरपर्यंत पावसाची प्रतीक्षा करावी लागेल. म्हणजे आणखी किमान तीन महिने तरी महाराष्ट्राला व विशेषत: मराठवाड्याला कडक उन्हाळा सोसावा लागणार आहे. कारण उन्हाळ्यात पाण्याची पुरेशी उपलब्धता असेल तरच उन्हाळा थोडाफार सुस होतो. मात्र, मार्च महिन्यातच मराठवाड्यातील धरणांमध्ये अवघा २०.५५ टक्के एवढा अत्यल्प पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागानेच स्पष्ट केले आहे. राज्यातील सहा महसुली विभागातील स्थितीही चिंताजनक आहे. सरासरी ३९.७६ टक्के पाणीसाठा राज्यात शिल्लक आहे. यात नागपूर ५०.१७ टक्के, अमरावती ५१.१९ टक्के, नाशिक ३९.९९ टक्के, कोकण ५२.२३ टक्के तर छ. संभाजीनगर २०.५५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. बीडचे माजलगाव धरण शून्यावर पोहोचले आहे तर मांजरा धरणात अर्धा टीएमसी पाणी शिल्लक आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर धरणात १८.१६ टक्के म्हणजे ६.५१ टीएमसी तर येलदरी धरणात १५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. नांदेडच्या निम्न मनारमध्ये ३२.१० टक्के म्हणजे १.५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. धाराशिवच्या तेरणा धरणात ४.२४ टक्के म्हणजे १.१९ टीएमसी पाणी शिल्लक आहे. मराठवाड्यातील बहुतांश मध्यम व लघु प्रकल्प शून्यावर पोहोचले आहेत.

एकंदर मराठवाड्याला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागणार हे स्पष्ट दिसत आहे. खरं तर राज्यात व विशेषत: मराठवाड्यात यावर्षी अत्यल्प पाऊस झाल्याने अशी भीषण पाणीटंचाई भेडसावणार हे सांगण्यासाठी कुठल्या तज्ज्ञाची वा भविष्यकाराची गरज नव्हती. अगदी शाळकरी पोरालाही टंचाई दारावर उभी असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. त्यामुळे हे प्रशासनात वा सरकारमध्ये बसलेल्यांना कळले नाही, असे मानणे धारिष्ट्याचेच! मात्र, तरीही शासनाने सतर्कतेने उपाययोजना हाती घेतल्याचे कुठेही दिसत नाही. सरकारची जुळवाजुळव आणि ती झाल्यावर सरकारच्या खुर्चीचे पाय मजबूत करण्याची कसरत यातच गुंग असलेले सरकार आता तर लोकसभा निवडणूक जाहीर झाल्याने पुरते 'इलेक्शन मोड'वर गेले आहे. युती-आघाड्यांची जुळवाजुळव, जागावाटप, असंतुष्ट-बंडखोरांची मनधरणी व दिल्लीच्या वा-या यातून जनतेच्या होरपळीकडे लक्ष द्यायला राज्यकर्त्यांना वेळच मिळालेला दिसत नाही. त्याच्या परिणामी राज्यातील शहरी व ग्रामीण जनता मार्च महिन्यातच तीव्र पाणीटंचाईला सामोरी जाते आहे. ग्रामीण भागाचा विचार केला तर परिस्थिती आणखी गंभीर आहे.मार्च महिन्यातच ग्रामीण भागात सध्या दरडोई केवळ चार ते पाच लिटर पाणी उपलब्ध होते आहे. हे वास्तव लक्षात घेता येत्या तीन महिन्यांत पाणीटंचाई किती अक्राळविक्राळ रूप धारण करेल याचा अंदाज यावा. उन्हाचा कडाका जसजसा वाढत जाईल तसतशी जनता पाण्यासाठी कासावीस होणार आहे. त्यात भरीस भर म्हणजे यावर्षी पावसाळा उशिराने सुरू होण्याचे व यंदाचा उन्हाळा शतकातील सर्वांत कडक उन्हाळा ठरण्याचे तज्ज्ञांचे भाकित आहे. ऐन निवडणुकीच्या गलबल्यात ही एवढी तीव्र पाणीटंचाई भेडसावणार असतानाही सरकारला याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची



गरज कशी काय वाटत नाही? असे कोडे खरं तर सामान्य जनतेला पडले असेल. मात्र, राजकारण्यांना त्याची चिंता वाटत नाही कारण या टंचाईचा सगळा दोष निसर्गावर टाकून नामानिराळे होण्याची सोय त्यांना कायमस्वरूपी उपलब्ध आहे. उलट निवडणुकांमध्ये त्यांना पाणी प्रश्नाचा प्रचंड कळवळा येतो व त्यावरून ही मंडळी रान पेटवतात. पाणी प्रश्न कायमचा संपविण्याच्या गर्जना केल्या जातात, भरमसाठ आश्वासने दिली जातात व निवडणुका जिंकल्या जातात. टँकरमुक्त महाराष्ट्र, जलयुक्त शिवार वगैरे घोषणा याच धाटणीच्या! त्याचे पुढे काय होते हे मात्र कुणी सांगत नाही आणि जनताही त्यांना त्याचा जाब विचारत नाही.त्यामुळे मग विभागा-विभागात, जिल्ह्या-जिल्ह्यात, एवढेच काय गावा-गावात पाण्यावरून तंटे-संघर्ष सुरू होतात आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या गर्जना करणारे हेच नेते प्रादेशिक अस्मितांचा तडका या संघर्षांना देऊन ते आणखी भडकावतात! या अस्मितेच्या मुद्यांना पुन्हा धर्माची जोड दिली जाते. याचभोवती प्रदेशाचे सर्वपक्षीय राजकारण फिरत राहील याची चोख व्यवस्था केली जाते. पाणीटंचाई निवारणाचे सार्वत्रिक व एकत्रित काम राज्य म्हणून कुठेही सुरू असल्याचे पहायला मिळतच नाही. पाणीटंचाईच्या या समस्येमागचे अर्थकारण पुन्हा वेगळेच! ते पाहता सरकार, प्रशासनात 'टंचाई आवडे सर्वांना' हेच चित्र पहायला मिळते. आता या अर्थकारणात स्थानिक लोकप्रतिनिधी व त्यांचे गल्लीबोळातले वा त्या-त्या गावातले चट्टेबट्टेही सहभागी झाल्याचे चित्र सर्रास पहायला मिळते. त्यातून टँकरमुक्त महाराष्ट्राची घोषणा झालेल्या आपल्या राज्यात नेमके उलटे म्हणजे 'टँकरयुक्त महाराष्ट्र' असे चित्र पहायला मिळते. केवळ मराठवाड्यात नाही तर राज्यात सर्वत्र या 'लॉबी' या खेळात समरसून सहभागी असल्याचे पहायला मिळतात. राज्यात एकदा का पाऊस पडला की पावसाच्या पाण्यात जनतेच्या तीव्र पाणीटंचाईच्या आठवणीही वाहून जातात याचा पुरता अनुभव असल्याने टंचाईत खो-याने पैसा ओढायचा व पावसाळा, हिवाळ्यात शांतपणे या पैशाचा पुरता उपभोग घ्यायचा हेच सूत्र 'लॉबी'च्या पक्के ध्यानात आले आहे.या सूत्राला जनतेचे सेवक म्हणवणा-या राजकीय नेत्यांचाही पूर्ण आशीर्वाद! मग पाणीटंचाई कायमची जाणार कशी? त्यामुळे पडणा-या पावसाचे पाणी साठवणे, पुनर्भरणाचे प्रयोग गांभीर्याने राबविणे, गावोगावी पाणी अडवून/साठवून भूजल पातळी वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणे, अशा अनेक उपाययोजना फक्त कागदावर व निवडणूक प्रचाराच्या भाषणांपुरत्याच राहतात. झळा सोसणा-या जनतेलाही अशा कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी संघर्ष करणे स्वत:साठी गरजेचे आहे याचे भान येत नाहीच. त्याचाच फायदा राजकारणी उचलतात. कसा? त्याचा प्रत्यक्ष अनुभव सध्या मराठवाड्यातील व राज्यातील जनता घेते आहेच. यावर यावेळच्या निवडणुकीत तरी राज्यकर्त्यांना प्रश्न विचारले जाणार का? याचेच उत्तर दुर्दैवाने नकारार्थीच येते. त्यामुळे निवडणुकीच्या बहरलेल्या हंगामाच्या ना-ना कळा सध्या चर्चेत असताना त्यात सामान्यांच्या पाणीटंचाईच्या झळा पुरत्या विरून गेल्याचेच चित्र आहे..

## कै.भारती नागनाथराव पांपटवार स्मृती संगीत समारोहामध्ये पं.गिरीश गोसावी यांची सुगम संगीताची सुरेल मैफिल 'स्वरसंध्या'चे आयोजन

**नांदेड | प्रतिनिधी**

नांदेड येथील कै. भारती नागनाथराव पांपटवार प्रतिष्ठान यांच्यावतीने कै.भारती नागनाथराव पांपटवार स्मृती संगीत समारोहात सुगम संगीताच्या सुरेल मैफिलमध्ये ' स्वरसंध्या' कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील आकाशवाणी व दूरदर्शन कलाकार पं. गिरीश गोसावी यांच्या गायनाचा कार्यक्रम दिनांक २९ मार्च शुक्रवार रोजी सायंकाळी साडेसहा वाजता श्रीकृष्ण मंदिर, काबरानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा संयोजक अनिल पांपटवार व सचिव अलका पांपटवार यांनी दिली आहे.पंडित गिरीश गोसावी हे आकाशवाणीचे मराठा, हिंदी उपशास्त्रीय संगीत



स्टाफ आर्टिस्ट असून पैठणच्या संत श्री एकनाथ महाराजांचे ते तेरावे वंशज आहेत. त्यांनी आजपर्यंत संगीताचे शिक्षण पैठण येथील त्र्यंबकराव गोसावी , पं.उत्तमराव अग्निहोत्री, नवनीतभाई पटेल व मधुसूदन भावे यांच्याकडे घेतलेले आहे.

त्यांना तबल्यावर दिनेश डोळे, संवादिनीवर गजानन केचे, स्वरसाथ आनंद कुलकर्णी, सहताल वाद्ये भगवानराव देशमुख हे साथसंगत करणार आहेत. या संगीत सुरेल मैफिलीचे निवेदन सुप्रसिद्ध निवेदनकार गोविंद पुराणिक हे करणार आहेत. मागील तीन वर्षापासून हा सांस्कृतिक उपक्रम अनिल नागनाथराव पांपटवार व सौ. अलका पांपटवार आयोजित करत आहेत. सुगम संगीताच्या या सुरेल मैफिलीला नांदेड शहरातील नागरिकांनी तसेच संगीतप्रेमी, दर्दी रसिकांनी व महिला, युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## आनंदी गुरुकुल मध्ये व्यसनमुक्त होली साजरी

**बीड | प्रतिनिधी**

होळी हा भारतामध्ये विशेषता उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक रंगांथा सण आहे. या सणाला होळी पौर्णिमा असेही म्हटले जाते. होलिकोत्सव, धूलिकोत्सव आणि रंगोत्सव म्हणजे होळी, धूळवड व रंगपंचमी अशी या उत्सवाची वेगवेगळी नावं आहेत. होळी अनेक रूपांमध्ये ओळावली जाते प्रेमाचा सण, वसंतोत्सव आणि रंगांचा सण है वसंत ऋतूचे आगमन आणि हिवाळ्याचा शेवट असल्याचे संकेत मानले जातात. है वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक म्हणून होळी हा सण साजरा केला जातो. हाच होळी सण धानोरा रोड येथील आनंदी गुरूकुल मध्ये होळी मधे सिगरेट बिड़ी, आळस,निंदा ,गुटखा, दारू याचे दहन करत एक आदर्श नागरिक घाड़ावा



व व्यसन व वाईट विचार प्रवूतीचे विचारांचे दहन करण्याचा उत्सव म्हणजे होळी सण अशी शिकवण प्रकल्प प्रमुख वाघमारे सर यानी माहिती दिली व वेगवेगळ्या समजामधे वेवेगळ्या प्रकारे सन साजरी केला जातो ही याबद्दल मार्गदर्शन केले, व बंजारा समाजाच्या मुलाने त्यांच्या भाषेत गाने गात उत्सव साजरी केला.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत

**लिंबागणेश | प्रतिनिधी**

संत एकनाथ महाराज षष्ठी सोहळा प्रित्यर्थ सालाबादप्रमाणे यावर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानची श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळयाचे मठाधिपती श्री.ह.भ.प.महंत महादेव बाबा भारती आणि श्री.ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली काल दि.२५ सोमवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करुन प्रस्थान झाले.पायी दिंडीचे १० वे वर्ष असून मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी झाले होते. बेलगाव ते मुळुकवाडी मार्गे ईश्वरभारती बाबांच्या जन्मगावी लिंबागणेश या ठिकाणी दिंडीचे मुख्य प्रवेशद्वारावर आतिषबाजी करुन फुलांनी सजवलेल्या आकर्षक रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती व महंत तुकाराम भारती महाराज यांचे शाल श्रीफळ, पुष्पहार



घालून स्वागत करत सवाद्य बँड बाजा पथकासह भाविकांनी मिरवणूक काढली.यावेळी सुवासिनींनी पाद्यपुजन करत ओवाळले. स्वागतासाठी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, दामु थोरात, पांडुरंग वाणी, विक्रांत वाणी, संतोष वाणी, अर्जुन घोलप, बाबु वाणी, शिवहारी कोटुळे, गणपत तागड, भगवान मोरे, अँड.गणेश वाणी, अनंतकाका मुळे, गणपत घोलप, दशरथ दशमे, विनायक वाणी, प्रकाश वायभट, विश्वंभर गिरी,आदि भाविक उपस्थित होते.बेलेश्वर मंदिराच्या ठिकाणी ग्रामस्थांच्या वतीने चहा,नाष्टा पाण्याची सोय करण्यात आली होती. पायी दिंडी सोहळा दि.२५ मार्च ते ०२ एप्रिल दरम्यान होत असुन पायी दिंडीचा बेलखंडी, बेलुरा, फुलसांगवी, अर्धपिंपरी, मुंगी, पैठण या ठिकाणाहुन प्रवास होऊन पायी दिंडी दि.०१ एप्रिल रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे. दि.०२ एप्रिल रोजी ह.भ.प.शांती ब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे. नाथषष्ठी सोहळ्यांमध्ये भजन किर्तन क ,भारुड संगीत भजन आदि कार्यक्रम संपन्न होतात. जेवणाची आणि राहण्याची मोफत व्यवस्था संस्थानच्या वतीने केली जाते. शांती ब्रम्ह तुकाराम महाराजांच्या अथक प्रयत्नांमुळे पंचक्रोशीतील भाविक पायी दिंडी सोहळ्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. या बद्दल सरपंच बालासाहेब जाधव, डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, विक्रांत वाणी यांनी महंतांचे आभार मानले. या वेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे बाबासाहेब डोंगरे, ढाकणे आदी हजर होते.

## प्रकाश आंबेडकर मनोज जरांगे पाटलांची भेट



**आंतरवाली सराटी**–वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांची रात्री उशिरा भेट घेतल्याची माहिती मिळत आहे.आज प्रकाश आंबेडकर यांची महत्वाची पत्रकार परिषद होणार आहे. याच पार्श्वभूमीवर ही भेट झाली का? आंबेडकर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान आंतरवाली सराटीमध्ये मध्यरात्री बाराच्या सुमारास प्रकाश आंबेडकर हे अंतरवली सराटी मध्ये दाखल झाले. यावेळी मनोज जरांगे पाटील आणि प्रकाश आंबेडकर यांच्यात तासभर चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

## पंकजा मुंडे यांचा केजमध्ये झंझावात ठिक ठिकाणी झालं जल्लोषात स्वागत

**केज | प्रतिनिधी**

पालकमंत्रीपदाच्या काळात केलेल्या कामाची पोचपावती आजही मला मिळते आहे. विकास करताना मी कधीच भेदभाव केला नाही. जात पाहिली नाही, बुथ प्लस आहे का मायनस हे देखील कधी बघितलं नाही.मी जिल्ह्याचा केलेला अभूतपूर्व विकास आणि तुमचा कमवलेला विश्वास हाच या निवडणूकीत माझा प्रचाराचा मुद्दा असेल, त्यामुळं बुद्धीभेद करणाऱ्यांपासून सावध रहा असं आवाहन भाजपच्या उमेदवार तथा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.

पंकजाताई मुंडे आज केजच्या दौर्यावर असून मतदारसंघांतील बुथ कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला, त्यावेळी त्या बोलत होत्या. आजच्या झंझावाती दौऱ्यात पंकजाताईंचं शहरात ठिक ठिकाणी मोठया जल्लोषात स्वागत झालं. आमदार नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, संतोष हंगे, तालुकाध्यक्ष भगवान केदार, विजयकांत




मुंडे, वासुदेव नेहरकर, सुनील गलांडे आदी यावेळी उपस्थित होते. धारूर चौकात राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांनी जोरदार स्वागत केले. स्वागताला सभेचं स्वरूप आले.पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या काळात सर्व जातीधर्माची मोट बांधली होती. आता त्यावेळेस सारखं परकीय आक्रमण नाही पण आज बुध्दीभेद करणाऱ्यांपासून आपल्याला सावध रहायचं आहे.तुमचं विश्व तुमच्या बुथ एवढं तालुक्याएवढं, काहीही झालं तरी तुम्ही तुमची जागा सोडायची नाही.स्वतःवर दिलेली जबाबदारी सोडून दुसर्या ठिकाणी काय चाललयं याकडे लक्ष द्यायचं नाही.मिडीयाने फक्त विरोधातल्या बातम्या लावू नयेत, हे समर्थन पण दाखवावं असं त्या म्हणाल्या.पालकमंत्री पदाच्या काळात जिल्हयात जी विकासाची कामे केली, त्याची आठवण लोकं आजही गावागावात गेल्यावर काढतात. ताई, तुम्ही हा रस्ता दिला, हे आरोग्य केंद्र दिलं, ही शाळा दिली. अशा कितीतरी कामं लोकं स्वतःहून सांगतात. विकास करताना मी जात-पात पाहिली नाही, बुथ प्लस की मायनस हे सुध्दा कधी बघितलं नाही असं पंकजाताई म्हणाल्या.मी शिवशक्ती परिक्रमा करून आलेय, माझी शक्ती तुम्हीच अन् भक्ती देखील तुमच्यावरच आहे.मी जिल्ह्याचा केलेला अभूतपूर्व विकास अन् तुमचा कमवलेला विश्वास हाच या निवडणूकीत माझा प्रचाराचा मुद्दा आहे. मला दाखवलेल्या काळ्या झेंड्याबद्दल माझा आक्षेप नाही, हे मनोज जरांगेच्या आंदोलनातील संबंधित नाहीत अस मला वाटतं. आपल्याला इतिहासाची पुनरावृत्ती करायचीय.मला आशिर्वाद द्या, तुम्हाला पश्चातापाची वेळ येऊ देणार नाही.मी केलेला विकासचं मला संसदेत घेऊन जाईल, अन यावेळी आपली कहाणी अधुरी राहणार नाही. यावेळी मी दिल्लीवरून सत्कारासाठी येईल तेव्हा मुंडे साहेबांच्या सत्काराची अधुरी कहाणी देखील आपल्याला पूर्ण करायची आहे. आपल्या स्वभावामुळे, चारित्र्यामुळे, वागण्यामुळे आणि आपल्या कामामुळे आपलाविजयनिश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.पंकजाताई मुंडे यांनी सकाळी केज शहरात आल्यावर स्वामी समर्थ मठात जाऊन समर्थांचे दर्शन घेतले. संत तुकाराम बीज निमित्त पावनधाम येथे आयोजित सप्ताहात उपस्थित राहून तुकाराम महाराजांचे आशीर्वाद घेतले.


# गायमुखचा झरा आटल्याने भावीकांचे हाल

## पशु आणि पक्षांनाही पाणी मिळेनासे झाले

**तळोधी (बा) । प्रणय बांगरे**

चंद्रपूर जिल्ह्यात सर्वदूर परिचित प्रसिध्द, भाविकांचे श्रद्धास्थान जागृत गायमुख देवस्थान येथील अखंड वाहणारा झरा अचानक काही दिवसापूर्वी बंद पडल्याने येथे दूरवरून येणारे भाविकांना पिण्याच्या तसेच स्वयंपाक करण्यासाठी लागणाऱ्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. पूर्वी हा झरा अनेक काळापासून अखंड वाहत होता. या झऱ्याच्या पाण्याचा पाणी पिणे, स्वयंपाक करणे, स्नान करणे, वस्त्र धुणे, स्वयंपाकचे भांडे धुणे, तीर्थ म्हणून घरी नेणे इत्यादी कामासाठी वापरात येत होते.

मानवाने विकास साधला अनेक प्रगती केली व स्वत:च्या स्वार्थासाठी निसर्गाच्या कामात धवळढवळ करायला सुरवात केली. अनेक शेतकऱ्यांनी गायमुख परिसरात असलेल्या शेतात बोर केल्या. या माध्यमातून उन्हाळी धानपीक घेत आहेत. रोज रोज वापरात येत असलेल्या बोरमुळे पाण्याची पातळी खाली गेली परिणामी हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गायमुख येथील





अखंड वाहणारा पाण्याचा झरा आटला. झरा बंद पडल्याने भाविकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. एकांत आणि निसर्गरम्य वातावरण असल्याने दूरवरून अनेक शाळा, विद्यालय, महाविद्यालयाच्या सहली वर्षभर यायच्या. गोंदिया चंद्रपूर रेल्वेमार्ग जवळच असल्याने गोंदिया, चंद्रपूर भंडारा नागपूर, गडचिरोली आदी जिल्ह्यातून भाविक कुटुंबासहीत वर्षभर येतात.गायमुख तीर्थ स्थानचा मुख्य कुंड, स्त्री व पुरुषांना स्नाणासाठी वेगवेगळे कुंड असल्यामुळे स्नान करण्यासाठी बालगोपाल, युवक, स्त्री पुरुशांना वेगळीच पर्वणी असते.मात्र आता पाण्याची सोय होत नसल्यामुळे अनेकांचा भ्रमाणिरास होत आहे.असे असले तरी भाविकांची गायमुख आणि इथे असलेल्या स्वयंभु मारुती देवस्थान वरील श्रद्धा कायम अगाध आहे. इथे रोज येणाऱ्यां भाविकांची गर्दी वाढत आहे.

गायमुख परिसरात फार मोठ्या प्रमाणावर माकड तसेच वेगवेगळे पक्षी आहेत.आता मात्र यांनाही पाण्याविना कंठ सोकला माझा, जीव कासावीस झाला. असं म्हणण्याची आणि कोणीतरी धाव गा आता. असे म्हणण्याची पाळी आली आहे.या पर्यटनस्थळी कुणीतरी शासन, प्रशासन दानी पुरुष मंडळींनी कायमस्वरूपी पाण्याची सोय उपलब्ध करावी. अशी मागणी भाविकाकडून होत आहे.

# नामदेवराव उसेंडी यांचा भाजपात प्रवेश

## राज्यात काँग्रेसला आणखी एक मोठा धक्का

**चिमूर । प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या विकासकार्यावर ,खंबीर नेतृत्वावर व राज्यातील कणखर नेतृत्व उपमुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि भाजपा-महायुतीच्या विकसनशील ध्येय-धोरणांवर प्रभावित होऊन काँग्रेस नेते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव, काँग्रेसच्या आदिवासी विभागाचे प्रदेशाध्यक्ष, गडचिरोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि सलग दोनदा चिमूर-गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे उमेदवार राहिलेले डॉ. नामदेवराव उसेंडी यांनी आज पत्रकार भवन, नागपूर येथे आयोजित भाजपाच्या पत्रकार परिषदेत भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा नेते तथा चिमूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया आणि भाजपा नेते तथा माजी आमदार आशिष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतला.



राज्यातील काँग्रेसचे मोठमोठे नेते तथा पदाधिकारी यांचे भाजपात मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू आहे. लोकसभा निवडणूक तोंडावर असतानाच काँग्रेस नेते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव, काँग्रेसच्या आदिवासी विभागाचे प्रदेशाध्यक्ष, गडचिरोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि सलग दोनदा चिमूर-गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे उमेदवार राहिलेले डॉ. नामदेवराव उसेंडी यांनी महायुतीला साथ देत भाजपात पक्षप्रवेश केल्यामुळे राज्यात व मुख्यतः चिमूर-गडचिरोली लोकसभा क्षेत्रात काँग्रेसला खिंडार पडले असून आणखी एक मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसकडून सतत आदिवासी समाजावर अन्याय होत असून, समाजातील नेत्यांना सुद्धा दुजाभाव करत असल्यामुळे आदिवासी समाजाची काँग्रेसवर प्रचंड नाराजी आहे. आदिवासी समाजातील उच्च शिक्षित, प्रभावशाली व समाज सेवेत वाहिलेल्या अश्या व्यक्तीमत्वाला डावलल्यामुळे समाज काँग्रेसपासून अधिक दुरावत चालला आहे. या पक्षप्रवेशाप्रसंगी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमवेत भाजपा नेते तथा चिमूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया आणि भाजपा नेते तथा माजी आमदार आशिष देशमुख व अन्य मान्यवरांनी काँग्रेस नेते तथा गडचिरोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. नामदेवराव उसेंडी यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा टाकून पक्षात सहर्ष स्वागत केले आणि पुष्पगुच्छ भेट देऊन मन:पूर्वक अभिनंदन करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोविड-१९' महामारीचे कशाला करता राजकारण?

# पराजयाच्या भीतीमुळे प्रतिभा धानोरकर यांचे निराधार आरोप - देवराव भोंगळे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'कोविड-१९' महामारीचा काळ संपूर्ण मानवजातीसाठी अत्यंत कठीण आणि तितकाच दुर्दैवी काळ होता. या काळात करोडो लोकांचे जीव गेले, लाखो कुटुंब उध्वस्त झाले. 'कोविड-१९' च्या जखमा आजही ताज्या असताना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्या जखमांना उकरण्याचे राजकारण त्यावेळी सत्तेत असलेल्या काँग्रेसकडून सुरू झाले आहे.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघासाठी नामांकन अर्ज सादर केल्यानंतर काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यावर आरोपाच्या थेट फेरी झाडल्या आहेत. कोविड-१९ विषाणुच्या महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या कामाचा पाढा वाचतानाच, स्वत:ला विकासपुरूष, लोकप्रतिनिधी म्हणवणारे सुधीर मुनगंटीवार यांनी कोरोना काळात काम केले नाही असा आरोप केला आहे.हे आरोप धादांत खोटे आणि निराधार असल्याचे चंद्रपूरचे माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी म्हटले आहे. 'कोविड-१९' च्या काळात सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या कामाची यादीच त्यांनी जाहीर केली आहे. ते म्हणाले, कोविडच्या काळामध्ये महाराष्ट्रात महविकास आघाडीचे सरकार होते.शासन व प्रशासनाच्या आधी या जिल्ह्यातील जनतेला मदतीचा पहिला हात देणारे





नेते सुधीर मुनगंटीवार होते. अशा कठीण काळात राज्यात शासनातले नेते ढिंम होते. सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधी पक्षात असूनही आरोग्य यंत्रणेच्या झूम बैठका घेत,यंत्रणेला कामाला लावले.सरकारमध्ये नसतांनाही स्वतः पुढाकार घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मॉस्क, पी. पी. ई. कीट्स आणि सॅनिटायझर उपलब्ध करून देऊन कामाला लावण्याचे काम सुधीर मुनगंटीवार यांनी केले. त्यांनी पुढाकार घेऊन तत्कालीन आरोग्य मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, आरोग्य सचिव, यांच्यासोबत झूम बैठका घेऊन चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधांना सरकारच्या मदतीची वाट न पाहता आवश्यक ते सर्व साहित्य वितरीत करण्याचे काम केले, असे देवराव भोंगळे म्हणाले.देवराव भोंगळे पुढे म्हणाले, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी २०० ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर, ५० व्हेंटिलेटर बेड तसेच, अनेकांना रेमडेसिवीर इंजेक्शन उपलब्ध करून देण्याचे काम केले. आरोग्य सेविका, डॉक्टर व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना १००० हून अधिक पीपीई किट देण्याचे काम सुधीर मुनगंटीवार यांनी केले. १०,६०० सॅनीटायझर बॉटल व कॅन, २,५,०००० मास्क, गरजूंना ५०,५६५ फुड पॉकेट तर २६,३८९ गरजु व्यक्तींना धान्यकिटचे वाटप केले आहे. याशिवाय, बाहेरगावी अडकलेल्या लोकांना स्वगृही आणण्याकरीता ३० ट्रॅव्हल्स, ४० ट्रक, ४० छोटी वाहनांची व्यवस्था, मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबीरांचे आयोजन, होमिओपॅथी गोळ्यांचे वितरण, रूग्णवाहिकांची व्यवस्थादेखील ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केली.'झूठ बोले कौवा काटे' ही हिंदीतील म्हण लोकांना चांगलीच माहिती आहे, त्यामुळे मतदारांनी अशा खोट्या प्रचाराला बळी पडू नये, असे आवाहनही देवराव भोंगळे यांनी यावेळी केले आहे

# गुलाब टेंभुर्णे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ,नागपूर यांच्या तर्फे दहाव्या वर्धापनदिनाचे औचित्याने विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दरम्यान यावर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार नागभीड तालुक्यातील जीवनापूर येथील सामाजिक कार्यकर्ते, कवी गुलाब टेंभुर्णे यांना जाहीर झाला आहे.

३१ मार्च रोजी जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या दहाव्या वर्धापन दिनाच्या आयोजित समारंभात विदर्भ हिंदी साहित्य संमेलन मधुरम् सभागृह,सीताबर्डी, नागपूर येथे देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार त्याच्या सामाजिक तथा साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल देण्यात येत आहे. फुले,शाहू,आंबेडकर तथा अनेक महापुरुषांच्या विचाराचा प्रचार, प्रसार करण्यासाठी कार्यक्रमाच्या माध्यमातून सक्रिय कार्य करीत आहेत व प्रासंगिक कवितांच्या माध्यमातून जागृतीचे निरंतर प्रयत्न करीत असतात.यापूर्वी सामाजिक जाणिवेतून जीवनापूर येथील बौद्ध समाज व जोशाबा ग्रुप तर्फे सन २०२३ मध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला होता. सध्या



ते आंबेडकरी विचारवंत 'योगिराज वाघमारे' यांच्या कादंबरीवर गोंडवाना विद्यापीठात सरदार पटेल महाविद्यालय, संशोधन केंद्र,चंद्रपूर येथे डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन (पी.एच.डी) करीत आहेत. त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# भाजपची ४० स्टार प्रचारकांची यादी!



**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली असून या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा समावेश असून ते उमेदवारांच्या प्रचारासाठी जोरदार कंबर कसणार आहे. त्यासोबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले,नारायण राणे, अनुराग ठाकूर, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, प्रमोद सावंत, भूपेंद्र पटेल, विष्णु देव साई, डॉ. मोहन यादव, भजनलाल शर्मा, ज्योतिरादित्य शिंदे, स्मृती ईराणी, रावसाहेब दानवे, शिवराज सिंह चौहान, सम्राट चौधरी, अशोक चव्हाण, विनोद तावडे, चंद्रशेकर बावनकुळे, आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, पियुष गोयल, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, के. अन्नामलाई, मनोज तिवारी, रवी किसन, अमर साबळे, विजयकुमार गावित, अतुल सावे आणि धनंजय महाडिक यांचा या स्टार प्रचारांच्या यादीत समावेश आहे.

# तरुण पर्यावरणवादी मंडळातर्फे घरोघरी पक्षी घागर वाटप



**चिमूर । प्रतिनिधी**

आता नेमकेच हिवाळ्याचे दिवस संपत असून उन्हाचा पारा दिवसेंदिवस चढत आहे. त्यामुळे पक्षी पाण्याच्या शोधात असतात. पक्षांना पाणी मिळणे कठीण होत असल्यामुळे पाण्याअभावी हजारो पक्षी मृत्यू मुखी पडत आहेत. या पक्षांना जीवदान देण्यासाठी येथील तरुण पर्यावरणवादी मंडळ पक्ष्याना पाणी पाजण्याचं अमूल्य कार्य करीत आहे. त्यामुळे त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तरुण पर्यावरणवादी मंडळांनी मागील पंधरा वर्षा पासून गावात व परिसरात पक्षी घागर ही संकल्पना समोर आणली आहे. या नुसार सर्वात आधी त्यांनी गावात पक्षी घागर चे वाटप केले. तसेच विद्यार्थ्यांना यात आवड निर्माण व्हावी, यासाठी शाळेत ही पक्षी घागर वाटप केले. विध्यार्थ्यांना निसर्ग चक्रात पक्ष्याचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावर्षी मंडळाने ५०० पक्षी घागर तयार करण्यात करून या पक्षी घागर गावात वाटण्यात येत आहे. एवढेच नाहीतर घरातील सदस्यांना पक्षी घागर मध्ये पाणी टाकून पक्ष्यांना पाणी पाजण्याचं पुण्यकर्म करा, अशी आर्त विनंती ही करण्यात येऊन पक्षाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमामुळे तहानलेल्या हजारो पक्षांना जीवदान मिळणार असून हे पक्षी घागर सरपंच साइश वारजुकर व उपसरपंच अशोक चौधरी यांच्या हस्ते झाडाला पक्षी घागर बांधून उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी वीरेंद्र हिंगे, सौरभ जयसवाल, आशिष चौधरी, आमोद गौरकर व मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# सामान्य निवडणूक निरीक्षकांची मिडीया सेंटरला भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी जाहिरातींचे प्रमाणीकरण, पेड न्यूज, फेक न्यूज, समाज माध्यमांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती (एम.सी.एम.सी) स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे कार्य जिल्हा माहिती कार्यालयाच्या मिडीया सेंटर येथून सुरू असून या सेंटरला चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचे सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., कार्यकारी अभियंता तथा निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी मुकेशकुमार टांगले उपस्थित होते.




यावेळी श्री. जाटव यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यम आणि सोशल मिडीयाच्या मॉनेटरिंगबाबत माहिती जाणून घेतली. तसेच सोशल मिडीयावर करण्यात येणा-या पोस्टबाबत अतिशय गांभिर्याने लक्ष ठेवावे, वृत्तपत्रात पेडन्यूज तसेच फेकन्यूज प्रकाशित झाल्यास त्वरीत कार्यवाही करावी, अशा सूचना दिल्या. प्रमाणीकरणासाठी उमेदवारांचे अर्ज किती दिवसात निकाली काढल्या जातात, याबाबत त्यांनी विचारणा केली. तसेच फाईल्सची पाहणी केली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर यांनी माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीचे कार्यपध्दती तसेच मिडीया सेंटर बाबत सामान्य निवडणूक निरीक्षकांना अवगत केले.

# चिमूर येथील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर उपरे यांचा भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पक्षात प्रवेश

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुका काँग्रेस कमिटी कार्यालय येथे राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतीश वारजूकर यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवून चिमूर येथील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर उपरे यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



यावेळी प्रामुख्याने चिमूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.विजय गावंडे, चंद्रपूर जिल्हा सरचिटणीस गजानन बुटके, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विवेक कापसे, चिमूर शहराध्यक्ष अविनाश आगडे, पर्यावरण विभाग अध्यक्ष प्रदीप तळवेकर, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष आरिफ शेख, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष नागेंद्र चट्टे, चिमूर तालुका उपाध्यक्ष राजू चौधरी, तालुका उपाध्यक्ष ॲड.धनराज वंजारी, शिवसेना उबाटा जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत कोल्हे, तालुका उपाध्यक्ष विनोद ढाकूनकर, नेरी शहर कार्याध्यक्ष घनश्यामजी चापले ,संजय कुंभारे, मधुकर मुंगले, मंगेश घ्यार, विलास मोहिंकर, राकेश साठवणे, श्रीकांत गेडाम, अक्षय नागरीकर, अक्षय लांजेवार, रोहन नंन्नावरे, अमित मोदी, व बरेच काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .